N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** चोपडा शहर **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0400 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/11/2021 19:45 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 30/11/2021

**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 30/11/2021

**Time From (वेळेपासून):** 12:04 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:04 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/11/2021 **Time (वेळ):** 18:25 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 033 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/11/2021 18:25 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** चोपडा शहरातील उपजिल्हा रुग्णाल

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** विश्वास रंगराव पाटील

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1972 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कंकराज पोस्ट भिलाली ता चोपडा ज,चोपडा शहर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कंकराज पोस्ट भिलाली ता चोपडा ज,चोपडा शहर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल तुकाराम पाटील | | | 1. कासार गल्ली नगरदेवळा ता पाचोर,चोपडा शहर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | विजय रुपचंद लढे | | | 1. मारवाडी गल्ली नगरदेवळा ता पाच,चोपडा शहर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

चोपडा शहर पोस्टे भाग6 .गुरनं.400/2021 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 (अ) प्रमाणे. यातील फिर्यादी हे दिव्यांग असुन त्यांनी सुमारे 02 महिन्यापुर्वी दिव्यांगत्वाचा दाखला मिळणेसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय जळगाव येथे अर्ज दिला होता. त्यानंतर फिर्यादी यांना आरोपी क्र. 01 हे भेटले व त्यांनी माझी जिल्हा सामान्य रुग्णालय जळगाव येथे डक्टरांशी ओळख असुन मी त्याचे कडुन तुला 40 टक्के चे वरील दिव्यागत्वाचे प्रमाणपत्र तयार करुन आणुन देतो. असे सांगुन 10,000/-रु लाचेची मागणी केली बाबत फिर्यादी यांनी दिनांक 29/11/2021 रोजी अँटी करप्शन ब्युरो जळगाव कार्यालयाकडे तक्रार दिली होती.सदर तक्रारीची दिनांक 30/11/2021 रोजी सापळा अधिकारी यांनी पंच साक्षीदार समक्ष पडताळणी केली असता यातील आरोपी क्र.1 याने फिर्यादी याचे कडेस जिल्हा सामान्य रुग्णालय जळगाव येथील डक्टराकडुन 40 टक्के चे वरील दिव्यागत्वाचे प्रमाणपत्र तयार करुन आणुन देण्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाचा वापर करुन तसेच आपल्या वैयक्तीक प्रभावाचा करुन 10,000/- रु लाच मागणी केली सदर लाच रक्कम वरील नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी क्र 1 यांनी स्वता स्वीकारुन सदर लाच रक्कम आरोपी क्र.2 याचे कडेस दिले म्हणुन गुन्हा सदर गुन्हाचे प्रथम खबरी अधिकारी असणारे मँजि.सो.यांचे कडेस रवाना करुन गुन्हाचा पुढील तपास एस.के.बच्छाव पोलीस निरीक्षक,नेम-अँटी करप्शन ब्युरो जळगाव हे करीत आहे.सदर सविस्तर टंकलिखीत केलेली फिर्याद सोबत जोडली आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): ajit nathu sawale
**Rank** (पद): I (Inspector)
**No.**(क्र.): ANSM8304 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकारी सही)
पोलीस हा. अमलदार
चोपडा शहर पो.स्टे
**Name** (नाव): avtarshing thakurshing chara
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

**फिर्याद** **चोपडा शहर पोलीस स्टेशन, जि.जळगाव**

**दिनांक ३०/११/२०२१**

**मी विश्वास रंगराव पाटील, वय ४९, व्यवसाय शेतमजुरी, रा.कंकराज पो.भिलाली ता.पारोळा जि.जळगांव**

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझी पत्नी सौ.जिजाबाई व दोन मुले यांचे सह राहतो. मी रोजंदारीने शेत मजुरीचे काम करुन माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो. मी दि.२९.११.२०२१ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात उपस्थित राहुन पोलीस निरीक्षक एस.के.बच्छाव साहेब यांचेकडेस लाचे संबधी तक्रार दिली ती खालील प्रमाणे

मी जन्मापासुन उजव्या हाताने दिव्यांग आहे. शासनाकडून मिळणा–या विविध योजनेसाठी मला माझे दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्राची आवश्यकता असते. त्यामुळे मी सन २०१६ मध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगांव येथे माझी वैद्यकिय तपासणी केली. त्यानुसार वैद्यकिय अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगांव यांनी माझे उजव्या हातास ४०% दिव्यांग असल्याचे ०३ वर्षासाठी तात्पुरते प्रमाणपत्र दिले होते. सदर प्रमाणपत्राची सन २०१९ मध्ये मुदत संपलेली आहे.मी सुमारे दोन महिन्यापुर्वी नवीन दिव्यांगत्वाचा दाखला मिळणेसाठी विहीत नमुन्यात फॉर्म भरुन सदरचा फॉर्म सामान्य रुग्णालय, जळगांव येथे दिला होता. त्यावर त्यांनी मला अॅडव्हास बुकींग कुपन क्र.१४८ असा देवुन दि.०१.१२.२०२१ रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगांव येथे हजर राहणे बाबत सांगितले होते.

त्यानंतर दि.१५.११.२०२१ रोजी मी जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगांव येथे गेलो. सदर ठिकाणी अनिल पाटील हे मला भेटले तेव्हा त्यांनी माझे जवळील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र मिळणेसाठीचे कागदपत्र पाहीले व मला सांगितले की, तुला जर ४०% चे वर दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र पाहीजे असेल, तर तु मला १०,०००/–रु. आणुन दे, पैशांशिवाय असे काम होत नाही, माझी जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगांव येथील डॉक्टरांशी ओळख असुन मी त्यांचे कडून तुला ४०% च्या वरील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र तयार करुन आणुन देतो. तु जर मला १०,०००/–रु. आणुन दिले नाही तर तुला ४०% च्या वरील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र मिळणार नाही,त्यामुळे तुला शासकीय योजनांचा फायदा घेता येणार नाही, असे सांगितले. तेव्हा मी अनिल पाटील यांना सांगितले की, मी जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगांव येथे फॉर्म भरुन दिला आहे. त्याचे कुपन मिळाले असुन त्यांनी ०१.१२.२०२१ रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगांव बोलविले आहे, असे सांगितले. त्यावेळी अनिल पाटील यांनी मला सांगितले की, तो अर्ज तिकडेच राहु दे, दि.३०.११.२०२१ रोजी उपजिल्हा रूग्णालय, चोपडा येथे दिव्यांग लोकांच्या प्रमाणपत्रा करीता कॅम्प आहे. त्याठिकाणी तुम्ही मला येवुन भेटा व १०,०००/–रु. आणुन द्या. मी तुम्हाला काही अडचण येवु न देता ४०% चे वरील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र संबंधीत डॉक्टरांकडून तयार करून आणुन देईल, असे सांगितले.

मी अनिल पाटील, यांना मागील ६ महिन्यांपासुन ओळखतो. त्यांची नगरदेवळा ता.पाचोरा येथे अखिल भारतीय राजमाता जिजाउ, दिव्यांग बहुउद्देशिय विकास संस्था, या नावाची संस्था असुन ते दिव्यांग लोकांसाठी काम करतात.त्यावरुन माझी खात्री झाली की अनिल पाटील हे माझे दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगांव येथुन संबंधीत डॉक्टरांकडून तयार करुन आणुन देण्याच्या मोबदल्यात माझे कडेस १०,०००/–रु. लाचेची मागणी करीत आहे. त्यावेळी मी अनिल पाटील यांना आता माझे जवळ ऐवढे पैसे नाहीत मी तुम्हाला १०,०००/–रु. देण्यास तयार आहे. परंतु मी तुम्हाला दि.३०.११.२०२१ रोजी सकाळी उप जिल्हा रुग्णालय, चोपडा येथे भेटतो असे सांगुन निघुन आलो आहे.

मी जर अनिल पाटील यांना १०,०००/–रु. लाचेची रक्कम दिली नाही तर ते स्वतःच्या प्रभावाचा वापर करुन माझे ४०% चे वरील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगांव येथिल संबंधीत डॉक्टरांकडून तयार करुन आणुन देणार नाहीत किंवा संबंधीत डॉक्टरांना सांगुन मला दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र मिळू देणार नाहीत. म्हणुन मी नाईलाजास्तव अनिल पाटील यांना १०,०००/–रु. देण्यास तयार झालो आहे. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई करावी.बाबत नमुद आहे.

वरील तक्रार मी माझे स्वतःचे हस्ताक्षरात कागदावर लिहुन दिली.त्यानंतर पोनि.बच्छाव साहेब यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेतले.त्यानंतर पोनि.बच्छाव साहेब यांनी दोन्ही पंचाचा,सापळा पथकाचा व माझा आपआपसात परीचय करून दिला.

त्यानंतर अनिल पाटील यांना देण्यासाठी मी माझे घर खर्चामधुन आणलेले १०,०००/–रू. रक्कम (त्यात ५००/–रू. दराच्या २० नोटा) बच्छाव साहेब यांचे समक्ष हजर केले. सदर नोटांना अ.पावडर लावणे बाबत पोहेकॉ/रविंद्र घुगे यांना सुचना दिल्या. त्याप्रमाणे त्यांनी सदर नोटांना अ.पा.पावडर लावुन सदरच्या नोटा एका पाकीटात टाकुन सिलबंद करुन सदर पाकीटावर पोनि.बच्छाव साहेब व दोन्ही पंचानी सहया केल्या होत्या व सदरचे सिलबंद पाकीट पोनि.बच्छाव साहेब यांनी त्यांचे ताब्यात ठेवले होते व पुढील कारवाई साठी मला दि.३०.११.२०२१ रोजी सकाळी ०९.०० वा. चोपडा शहरातील चोपडा अमळनेर रोड वरील पेट्रोल पंपाजवळ हजर राहण्यास सांगितले होते.तसा दि.२९.११.२०२१ रोजी पंचनामा केला आहे.

त्याप्रमाणे मी दि.३०.११.२०२१ रोजी चोपडा शहरातील चोपडा अमळनेर रोड वरील पेट्रोल पंपाजवळील बापु टी हाउस जवळ उपस्थीत होतो.त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.पाटील साहेब, पोनि.बच्छाव साहेब,दोन्ही शासकीय पंच व सापळा पथक असे खाजगी तवेरा वाहनाने माझे जवळ आले. त्यानंतर पोनि.बच्छाव साहेब यांनी मला त्यांचे खाजगी वाहनात बसवुन घेतले. तेव्हा पोनि.बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्रं. १ प्रकाश भोटकर अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर पोनि.बच्छाव साहेब यांनी त्यांचे कडेस असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखविले व त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डमधील मेमरीकार्ड मध्ये माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य घेतले. त्यानंतर सदरचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते

पोलीस ठा. अंमलदार
चोपडा शहर पो.स्टे.

माझे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला, पंच क्रं.१ यांचेसह अनिल पाटील,खाजगी व्यक्ती यांची भेट घेण्यासाठी उपजिल्हा रुग्णालय, चोपडा येथे पायी पाठविले होते.

तेव्हा मी व पंच क्र.०१ असे सदर ठिकाणाहुन पायी निघुन उपजिल्हा रुग्णालय, चोपडा येथे गेलो. सदर ठिकाणी दिव्यांग लोकांचा कॅम्प लागलेला होता. तेव्हा मी अनिल पाटील यांचा सदर ठिकाणी शोध घेतला तेव्हा मला अनिल पाटील हे एके ठिकाणी उभे असल्याचे दिसले. त्यानंतर मी व पंच क्र १ असे अनिल पाटील यांचे जवळ गेलो. सदर ठिकाणी माझी अनिल पाटील यांचे सोबत माझे दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र मिळणे संदर्भात चर्चा झाली. त्यानंतर अनिल पाटील यांनी माझे जवळील कागदपत्रांची पाहणी करुन १०,०००/–रु. लाचमागणी केली. तेव्हा मी त्यांना मला संबंधीत डॉक्टरांची भेट घालुन द्या, असे सांगितले असता त्यांनी मला डॉक्टर तुम्हाला भेटणार नाही, तुम्ही माझे जवळ पैसे आणुन द्या, तुमचे कागदपत्र मी डॉक्टरांकडे जमा करतो, तुम्हाला कायमस्वरुपीचे दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र काढून देतो, असे सांगितले. तेव्हा मी अनिल पाटील यांना माझी डॉक्टरांनी प्रत्यक्ष भेट घालुन द्या मी त्यांना माझे कामाबद्दल व पैसे काही कमी जास्त होतात का? याबाबत बोलतो. त्यावर त्यांनी स्पष्ट टाळाटाळ करुन मला डॉक्टरांची भेट घेता येणार नाही असे सांगितले. त्यानंतर मी अनिल पाटील यांना एक तासात पैसे घेवुन येतो असे सांगुन सदर ठिकाणाहुन निघुन सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर माझे अनिल पाटील यांचे सोबत झालेले संभाषण दोन्ही पंचानी व बच्छाव साहेब यांनी ऐकले. तेव्हा बच्छाव साहेब व दोन्ही पंच यांची लाचमागणी बाबत खात्री झाल्याने व वेळ कमी असल्याने त्यांनी लागलीच पुढील सापळा कार्यवाही सलगपणे करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर पोनि.बच्छाव साहेब यांनी दि.२९.११.२०२१ रोजी माझे कडून घेतलेली लाचेची रक्कम १०,०००/–रु. (त्यात ५००/–रू.दराच्या २० अ.पा.लावलेल्या नोटा) एका सिलबंद पाकीटातुन बाहेर काढल्या त्यानंतर पोनि.बच्छाव साहेब यांचे सुचने प्रमाणे सदर लाचेच्या नोटा पोहेकॉ/रविंद्र घुगे यांनी माझे शर्टच्या वरील डाव्या बाजुच्या खिश्यात अलगद ठेवुन दिल्या होत्या.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्रं.१ अशांना पुन्हा थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पुन्हा नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला व पंच क्रं.१ अशांना अनिल पाटील यांची भेट घेवुन त्यांना १०,०००/–रु. लाच रक्कम देण्यासाठी उपजिल्हा रुग्णालय, चोपडा येथे पायी पाठविले होते.तेव्हा बच्छाव साहेब यांनी सदर ठिकाणी आजुबाजुस सापळा लावला होता. तेव्हा मी व पंच क्रं. १ असे चोपडा उपजिल्हा रुग्णालय येथे गेलो. तेव्हा माझी व अनिल पाटील यांची समक्ष भेट झाली तेव्हा अनिल पाटील व माझेत माझे दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्राबाबत चर्चा झाली.तेव्हा मी अनिल पाटील यांना मी आता पैसे आणले आहे. मला आता डॉक्टरांशी भेट घालुन द्या असे सांगितले असता त्यावर त्यांनी तुम्हाला डॉक्टरांची भेट घेता येणार नाही, मी स्वत: त्यांचे कडून काम करुन आणेल असे सांगुन डॉक्टरांची भेट घालुन देण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर अनिल पाटील यांनी मागणी केल्या प्रमाणे मी माझे शर्टचे वरील डाव्या बाजुच्या खिशात असलेले १०,०००/–रुपये (त्यात ५००/–रुपये दराच्या २० चलनी नोटा) लाच रक्कम माझे उजव्या हाताने बाहेर काढुन सदरची रक्कम अनिल पाटील यांचे समोर धरली असता अनिल पाटील यांनी सदर लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारुन सदर लाचेची रक्कम त्यांचे जवळ उभे असलेल्या एका इसमाजवळ दिली.त्यानंतर लागलीच मी ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास इशारा केला. तेव्हा बच्छाव साहेब व सापळा पथक यांनी अनिल पाटील व सदर लाच रक्कम ताब्यात असलेल्या इसमास रंगेहाथ पकडले.

त्यानंतर पोनि.बच्छाव साहेब यांचे सुचने नुसार माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा पोनि.बच्छाव साहेब यांनी अनिल पाटील व सदर इसमास त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी प्रथम अनिल पाटील यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव अनिल तुकाराम पाटील, वय ४६,व्यवसाय मजुरी,रा.कासार गल्ली,नगरदेवळा ता.पाचोरा असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले.त्यानंतर बच्छाव साहेब यांनी लाच रक्कम ताब्यात असलेल्या इसमास त्यांचे पुर्ण नाव,गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव विजय रुपचंद लढे (लढढा), वय ६७, व्यवसाय व्यापार, रा.मारवाडी गल्ली नगरदेवळा, ता.पाचोरा जि.जळगांव असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने त्यांना देखील ताब्यात घेतले.

त्यानंतर पुढील कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालयात करण्यात आली. सदर कार्यालयातील एका रुममध्ये अनिल तुकाराम पाटील, विजय रुपचंद लढे (लढढा), माझे व दोन्ही पंचाच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. त्यानंतरची पुढील उर्वरीत सापळा कारवाई बच्छाव साहेब यांनी केली आहे. तसा सलगपणे सविस्तर पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे आरोपी क्र.०१अनिल पाटील यांनी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाचा वापर करुन तसेच आपल्या वैयक्तीक प्रभावाचा वापर करुन दि.३०.११.२०२१ रोजी पंचासमक्ष माझे दिव्यांगत्वाचे ४०% च्या वरील प्रमाणपत्र जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगांव येथील संबंधीत डॉक्टरांकडून तयार करुन आणुन देण्याच्या मोबदल्यात माझेकडेस १०,०००/–रु. लाच मागणी केली व सदर लाच रक्कम आरोपी क्र.०१ याने दि.३०.११.२०२१ रोजी १२.०४ वा. चोपडा उपजिल्हा रुग्णालयाच्या आवारात स्वत: स्विकारुन सदर लाच रक्कम आरोपी क्र.०२ यांचे ताब्यात दिली. तसेच आरोपी क्र.०२ विजय लढे (लढढा) यांनी सदर लाच रकक्म आरोपी क्र.०१ यांचे कडून ताब्यात घेतली म्हणुन माझी दोन्ही आरोपींविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

समक्ष

एस.के.बच्छाव
पोलीस निरिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

30/11/2021

फिर्यादीची सही

विश्वास रंगाराम पाटील